# उपवनसंरक्षक, भंडारा वनविभाग, भंडारा यांचे कार्यालय

राष्ट्रीय महामार्ग क्र.6, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, भंडारा -441904

दूरध्वनी क्र- 07184-252283 Email Id :-dycfbhandara@mahaforest.gov.in dycfbhandara@yahoo.com


क्रमांक कक्ष-8 /सर्व्हे/ प्र.क्र. / 647 /22-23 भंडारा दिनांक - 21/ 6 /2022

**विषय:-वनजमीन भंडारा**

Proposal for diversion of 3.84 ha. of forest land for non forestry use i.e. for Industrial Unit of Ashok Leyland in District Bhandara of Maharashtra State.

**प्रति,**

मे. अशोक लेलॅन्ड लिमिटेड,
1 गडेगांव, भंडारा-441904

**संदर्भ** - 1) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचे पत्र क्र. D-17/Nodal /Nagpur/ID 12892/ 1140 / 21-22 दिनांक 05/10/2021

2) आपले पत्र क्रमांक - AL/FCA/Forest/Proposal/21-22 दिनांक 17/12/2021

3) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष8/वनसंवर्धन/प्रक्र/ 1240 / दिनांक 17/1/2022

4) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष8/वनसंवर्धन/प्रक्र/ 405 / दिनांक 19/5/2022

5) आपले पत्र क्रमांक - AL/FCA/Forest/Proposal/22-23/01 दिनांक 17/06/2022

वन (संवर्धन) अधिनियम 1980 चे तरतुदीनुसार केंद्रशासनाकडील 28/03/2019 रोजीचे सुधारित हँडबुक, पर्यावरण व वन मंत्रालयाकडील अधिसुचना दिनांक 10/01/2003 उपखंड 7 चे मुददा क्र. 4(e) (iii) आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचे संदर्भ पत्र क्र. 1 अन्वये निर्देशित केल्याप्रमाणे आपण सुधारित 3.84 हे.आर वनजमीन वळतीकरणाचा प्रस्ताव संदर्भ पत्र क्र. 2 अन्वये या कार्यालयास सादर केलेला असुन या कार्यालयाचे संदर्भ पत्र क्र. 3 नुसार सदर प्रस्ताव मुख्य वनसंरक्षक (प्रा.) नागपूर यांचेकडे सादर केलेला आहे.

सदर प्रस्तावाचे अनुषंगाने अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी म.रा. नागपूर यांचे पत्र क्र. 77 दिनांक 8/04/2022 नुसार प्राप्त सुचना व वरिष्ठ कार्यालयासोबत चर्चा करुन प्रकल्पाकरिता बाधीत होत असलेल्या 3.84 हे.आर वनजमीनीचे वनविभागाकडील अधिकारी/कर्मचा-यांचे उपस्थितीत DGPS दवारे सर्व्हे व सिमांकन करुन त्याबाबतचा नकाशा व सॉप्ट कॉपी सह अहवाल या कार्यालयास सादर करावा असे या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक 4 अन्वये कळविण्यात आले होते.

विषयांकीत प्रकरणी दिनांक 10/06/2022 रोजी बाधीत होत असलेल्या वनक्षेत्राचे व हस्तांतरीत करावयाचे वनक्षेत्राचे वनविभागाकडील अधिकारी/कर्मचारी व वनसर्व्हेक्षक यांचे उपस्थितीत DGPS द्वारे सर्व्हे व सिमांकन करुन त्याबाबतचा नकाशा (सॉप्ट कॉपी सह) संदर्भिय पत्र क्रमांक 5 अन्वये या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. त्यानुसार मोक्यावर केलेले सिमांकन योग्य असल्याची खात्री करण्यात आली आहे. प्रकरणी करावयाच्या पुढील कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे दक्षता घेण्यासंबंधी कळविण्यात येत आहे.

➢ DGPS दवारे केलेल्या सिमांकनाप्रमाणे सहा. वनसंरक्षक साकोली व वनपरिक्षेत्र अधिकारी, लाखनी यांचेशी समन्वय ठेऊन मोक्यावर Chainlink व Fencing ची कामे सुरु करावीत.

क्र ५१५

- संदर्भिय पत्र क्र. 5 अन्वये नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे BP 41 ते BP 43 दरम्यान एक Gate तसेच BP 3 ते BP 4 दरम्यान एक Gate असे दोन Gate वनपरिक्षेत्र अधिकारी, लाखनी यांनी निर्देशित केल्यानुसार लावण्यात यावेत.
- जिथे जिथे शक्य असेल तिथे तिथे अक्षांश - रेखांश पेंटने फेंसिंग पोलवर दर्शविण्यात यावे.
- Chainlink व Fencing ची कामे करतांना कोणत्याही प्रकारची वृक्षतोड करता येणार नाही याची दक्षता घ्यावी.
- सदर क्षेत्रातील वन्यप्राण्यास कोणतेही नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

मोक्यावर वरिलप्रमाणे दक्षता घेऊन कामे पुर्ण झाल्यावर त्याचा अहवाल काम सुरु करण्यापुर्वीचे / काम सुरु असतांनाचे व काम पुर्ण झाल्यानंतरचे Geo-tagged फोटोसह या कार्यालयास सादर करावेत. आपलेकडील अहवाल प्राप्त झाल्यानंतर या कार्यालयाद्वारे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(राहुल भा.गवई)
उपवनसंरक्षक,
O/C भंडारा वनविभाग भंडारा

**प्रतिलिपी**: अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी म.रा. नागपूर यांना माहीतीस सविनय सादर.
**प्रतिलिपी**: मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त नागपूर यांना माहीतीस सविनय सादर.
**प्रतिलिपी**: सहा. वनसंरक्षक (साकोली) यांना माहितीकरिता अग्रेषित.
**प्रतिलिपी**: वनपरिक्षेत्र अधिकारी, लाखनी यांना माहितीकरिता रवाना.